C (13)

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्ष 1989 मध्ये स्थापिलेले)

ज्ञानगंगा घरोघरी

## व्यवस्थापन मंडळ बैठक

## कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| बैठक क्रमांक | : | 162 |
| स्थळ | : | शैक्षणिक इमारत — संगणक कक्ष<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ<br>नाशिक, 422222 |
| वार व दिनांक | : | मंगळवार, दिनांक : 7 फेब्रुवारी 2017 |
| वेळ | : | दुपारी : 12.30 वाजता |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

## कार्यवृत्त

162 वी, व्यवस्थापन मंडळ बैठक, मंगलवार, दिनांक 7 फेब्रुवारी 2017 रोजी दुपारी 12.30 वाजता, शैक्षणिक इमारत — संगणक कक्ष येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

1. प्रा.डॉ. दिलीप म्हैसेकर, प्रभारी कुलगुरु, — अध्यक्ष
2. मा.डॉ.डब्ल्यु.एन.गाडे,कुलगुरू,पुणे — सदस्य
3. मा. डॉ. एस.ए. ठोंबरे. औरंगाबाद — सदस्य
4. मा.श्री.उल्हास एन. गवळी, औरंगाबाद — सदस्य
5. मा. प्रमोद बियाणी, संचालक, शैक्षणिक सेवा विभाग,यचममुवि,नाशिक — सदस्य
6. डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव — सचिव
7. मा.प्रभारी वित्त अधिकारी,य.च.म.मुक्त विद्यापीठ,नाशिक — निमंत्रित सदस्य
8. मा. परीक्षा नियंत्रक, य.च.म.मुक्त विद्यापीठ,नाशिक — निमंत्रित सदस्य

**खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.**

1. मा. सचिव,उच्च व तंत्रशिक्षण,मुंबई — सदस्य
2. मा. सचिव, उद्योग, मुंबई — सदस्य
3. मा. सचिव, कृषी, मुंबई — सदस्य
4. मा.संचालक,उच्च शिक्षण,पुणे — सदस्य
5. मा.संचालक, तंत्रशिक्षण — सदस्य
6. मा.संचालक,व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण — सदस्य
7. मा.श्री.हेमंत टकले, मुंबई — सदस्य
8. मा.डॉ.बंदी व्यंकटेशवारलू,कुलगुरू,परभणी — सदस्य
9. मा. डॉ. विद्या येरावडेकर, पुणे — सदस्य
10. मा. प्रा. कपिल कुमार, नवी दिल्ली — सदस्य
11. मा.डॉ.व्ही.एल.माहेश्वरी, जळगाव — सदस्य
12. मा. डॉ. आर.सेशा अय्यर, मुंबई — सदस्य

| ठराव क्र. | | तपशील |
|---|---|---|
| 162.1.0 | 162.1.1 | स्वागत<br>मा.कुलसचिव यांनी उपस्थित सदस्यांचे स्वागत केले, व बैठकीस सुरवात करण्यात आली. |
| 162.2.0. | 162.2.1 | शासननिर्णयानुसार मराठी भाषा दिनासाठी आर्थिक तरतूद रु. 15 लक्ष व 'बोलू कवतिके' (सुरभी,पुणे) या कार्यक्रमाचे दि. 26 फेब्रुवारी 2017 रोजी आयोजन करण्यास |

**व त्यासाठी येणारा अंदाजे खर्च रु. 9,90,000/-मान्यता देण्याची बाब विचारार्थ सादर...**

**(सहपत्र –A)**

टिपणी — महाराष्ट्र शासन , उच्च व तंत्र शिक्षण यांच्या दि. 20 जानेवारी 2017 च्या शासन परिपत्रक क्र. बैठक क्र. 2413(प्र.क्र. 4/17) समन्वय अनुसार व दि. 3 फेब्रुवारी 2017 रोजी एस.एन.डी.टी. विद्यापीठ,मुंबई येथे मराठी भाषा गौरव दिन साजरा करणेबाबत मा. शिक्षणमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली सदर बैठकीत प्रत्येक विद्यापीठाने वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दि.27 फेब्रुवारी 2017 हा जन्मदिन "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा करण्याचे निर्देश देण्यात आले. या अनुषंगाने शासन परिपत्रक क्र.-2413 / (प्र.क्र. 04/17 )समन्वय दि.20 जानेवारी 2017 निर्गमीत करण्यात आला. त्यानुसार प्रत्येक विद्यापीठाने यासाठी रु. 10 ते 15 लक्ष तरतुद करण्याचे निर्देश आहेत. प्रत्येक विद्यापीठाला दिलेल्या तारखांना एक मोठा कार्यक्रम करण्याचे सदर बैठकीत निर्देश देण्यात आले.त्यानुसार यशवंतराव चव्हाण महाराष्ट मुक्त विद्यापीठाला दि. 26.2.2017 रोजी 'बोलू कवतिके' सुरभी,पुणे यांचा कार्यक्रम प्रस्तावित खर्च एकूण रु. 9,90,000/- (रुपये नऊ लक्ष नव्वद हजार फक्त) करण्याचे निर्देश देण्यात आले त्यानुसार सदर कार्यक्रम सुरभी,पुणे या संस्थेद्वारे आयोजित करून त्यासाठी येणारा खर्च रु. 9,90,000/- (रुपये नऊ लक्ष नव्वद हजार फक्त) व अनुषांगीक खर्चास मान्यता देण्याची बाब विचारार्थ सादर

महाराष्ट्र शासन निर्देशानुसार मराठी भाषा दिनाच्या खर्चासाठी विद्यार्थी कल्याण केंद्राच्या कुसुमाग्रज अध्यासनाअंतर्गत **Ceremony & Functions** हे लेखाशीर्ष निर्माण करण्यास व या लेखाशीर्षात रु. 15 लक्ष तरतूद करण्यास मान्यता देण्यास प्रस्ताव सादर

**व्यवस्थापन मंडळ ठराव –**

01. महाराष्ट्र शासन , उच्च व तंत्र शिक्षणाच्या शासन परिपत्रक क्र. बैठक क्र. 2413(प्र.क्र. 4/17) समन्वय यांच्या दि. 20 जानेवारी 2017 नुसार श्री.वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज याचा दि. 27 फेब्रुवारी 2017 हा जन्मदिवस "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा करण्यात यावा तसेच यासंदर्भात दि. 3 फेब्रुवारी 2017 रोजी एस.एन.डी.टी. विद्यापीठ,मुंबई येथे मराठी भाषा गौरव दिन साजरा करणेबाबत मा. शिक्षणमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. विद्यापीठाचे प्रतिनिधी डॉ.राजदेरकर व डॉ.विजया पाटील उपस्थित होते.सदरील बैठकीत दिलेल्या सुचनेनुसार व त्यांच्या अहवालानुसार यशवंतराव चव्हाण महाराष्ट मुक्त विद्यापीठाने नाशिक शहरासाठी दि. 26.2.2017 रोजी मराठी भाषा गौरव दिन आयोजित करण्याकरिता 'बोलू कवतिके' सुरभी,पुणे यांचा कार्यक्रम करण्यास व त्यासाठी येणारा एकूण खर्च रु. 9,90,000/- (रुपये नऊ लक्ष नव्वद हजार फक्त)व त्या अनुषंगाने मराठी भाषा गौरव दिन सप्ताह साजरा करण्याकरिता लागणा-या इतर खर्च रु. 15 लक्ष या तरतूदीतून करण्यास मान्यता देण्यात आली.

02. यासाठी विद्यार्थी कल्याण केंदाच्या कुसुमाग्रज अध्यासनाअंतर्गत Ceremony & Functions हे लेखाशीर्ष निर्माण करण्यास व या लेखाशीर्षात रु. 15 लक्ष तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| 162.3.0 | | मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय |
| | 162.3.1 | **UGC- Distance Education Bureau,New Delhi यांच्याकडे सादर करावयाच्या अर्जासोबत UGCने दिलेल्या Undertaking सादर करण्यास मान्यता मिळणेबाबत**<br>(टिपणी - यशवंतराव चव्हाण महाराष्ट मुक्त विद्यापीठाने वित्तीय वर्ष 2016-17 साठी Development Grant साठी UGC- Distance Education Bureau,New Delhi यांच्याकडे सादर करावयाच्या अर्जासोबत UGC ने दिल्यानुसार Undertaking सादर करावयाचे आहे. सदरील बाब व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - UGC- Distance Education Bureau,New Delhi **यांच्याकडे विद्यापीठाकरिता वित्तीय वर्ष** 2016-17 **साठी** Development Grant **मिळण्यासाठी सादर करावयाच्या अर्जासोबत** UGC **ने दिलेल्या** Undertaking **सादर करण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 162.3.2 | **विद्यापीठाच्या सोहळयासाठी रु. 15 लक्ष खर्चास मान्यता मिळणेबाबत**<br>(टिपणी –विद्यापीठाच्यावतीने भारतरत्न श्रीमती लता मंगेशकर यांना डि.लिट. पदवी प्रदान करण्यास मान्यता देण्यात आली. सदरील पदवी प्रदान सोहळा मुंबई येथे आयोजित करण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या डी.लिट.सोहळयासाठी अंदाजे रु. 15 लक्ष खर्च अपेक्षित आहे सदर खर्च व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - भारतरत्न श्रीमती लता मंगेशकर यांना डि.लिट. पदवीप्रदान करण्याचा समारंभ मुंबई येथे आयोजित करण्यात येत आहे. या समारंभासाठी अंदाजे रु. 15 लक्ष खर्चास मान्यता देण्यात आली.** |

**सचिव**
**व्यवस्थापन मंडळ**

**अध्यक्ष**
**व्यवस्थापन मंडळ**